(**इंग्रजी भाषेतील न्यायनिर्णयाचा मराठी भाषेत अनुवाद**)

[१९९६] ३ एस. सी. आर. ८८४

भारमाप्पा नेमन्ना कावळे आणि अन्य
-विरुद्ध-
धोडी भिमा पाटील आणि इतर

२५ मार्च, १९९६

[ के. रामास्वामी आणि जी. बी. पट्टनायक, न्या. न्या.]

जमिनीविषयक कायदेः

मुंबई कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम, १९८४ :

कलम १८५-क - बेदखली करण्याविषयी दावा, प्रतिवादी हा कुळ नाही असा निर्णय देऊन दिवाणी न्यायालयाने हुकूमनामा काढला - हुकूमनाम्याची अंमलबजावणी - न्यायिक संबंधाचा अभाव असल्याचे अंमलबजावणीमध्ये उपस्थित केलेले प्रतिकथन निष्फळ ठरविण्यात आले - न्यायालयाने अंमलबजावणी करणाऱ्या न्यायालयाला कुळवहिवाटचा वादप्रश्न निर्णीत करण्याचे निर्देश दिले - निर्णय देण्यात आला, कुळवहिवाटचा वादप्रश्न अंतिम झाल्याचे ठरविण्यात आल्याने, कुळवहिवाटचा वादप्रश्न हुकूमनाम्याखाली अंतिम झाल्याने, हुकूमनामा अंमलबजावणीबद्दल घेतलेला आक्षेप विचारार्थ स्वीकारण्यास नकार देण्यामध्ये अंमलबजावणी न्यायालय बरोबर होते - आक्षेप विचारात घेण्यात यावे असे अंमलबजावणी न्यायालयास निर्देश देण्यामध्ये उच्च न्यायालय योग्य होते असे म्हणता येणार नाही.

दिवाणी अपील अधिकारिता : दिवाणी अपील क्र. ५३७६/१९९६.

रिट याचिका क्रं. ३१९/१९८२ मध्ये मुंबई उच्च न्यायालयाने दिलेला न्यायनिर्णय व आदेश, दिनांक २२.११.९१ यातून.

अपीलकर्त्यांसाठी : डॉ. आर. बी. मासोदकर आणि सुश्री. वृंदा धर.

उत्तरवादींसाठी : ए. एस. भस्मे.

न्यायालयाचा पुढील आदेश देण्यात आला :

विलंब क्षमापित केला.

बदली मजकुराबाबत आदेश देण्यात आला.

अनुमती देण्यात आली. आम्ही दोन्ही बाजूच्या विद्वान  काउन्सेल यांचे म्हणणे ऐकले आहे.

मान्य केलेली स्थिती अशी आहे की दिवाणी न्यायालयाने अपीलकर्त्याविरुद्ध बेदखल करण्याबाबतच्या दाव्यात हुकूमनामा काढून, तो कुळ नव्हता असा निर्णय दिला, जो आदेश अंतिम झाला होता. न्यायिक संबंधाच्या अभावाचे तेच प्रतिकथन अमंलबजावणीत उपस्थित करण्याचा प्रयत्न केला आहे. जेव्हा उपस्थित केलेला आक्षेप विचारार्थ स्वीकारण्यास नाकारण्यात आला, तेव्हा उच्च न्यायालयाने रिट याचिका क्रं. ३३१९/१९९२ मध्ये आदेश, दिनांक २२, नोव्हेंबर, १९९१ द्वारे अंमलबजावणी न्यायालयाला वादप्रश्न निर्णीत करण्याचे निर्देश दिले. तदनुसार, हे अपील विशेष अनुमतीने दाखल करण्यात आले.

श्री. भस्मे, उत्तरवादीच्या वतीने विद्वान काउन्सेल यांनी युक्तिवाद केला की मुंबई कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम, १९४८ च्या कलम ८५-क मध्ये वापरलेली विनिदिर्ष्ट भाषा लक्षात घेता, एकमेव सक्षम प्राधिकारी ज्याला वादप्रश्न निर्णीत करावयाचा असतो तो अधिनियमाखालील महसूल प्राधिकारी आहे आणि अपीलकर्ता हा कुळधारक आहे किंवा कसे हा वादप्रश्न निर्णीत करावयाची कोणतीही अधिकारिता दिवाणी न्यायालयाला नाही. त्यामुळे, अंमलबजावणी न्यायालयास वादप्रश्न निर्णीत करण्याचे निर्देश देण्यात उच्च न्यायालय बरोबर होते. हे काहीसे दुर्देवी आहे की उत्तरवादीने तो कुळधारक नाही असे

मानून हुकूमनाम्यास अंतिम बनण्यासाठी मुभा दिलेली आहे. त्यास अंतिम बनू दिल्यामुळे, तो अधिनियमाखाली अजूनही कुळधारक आहे असे म्हणण्याची त्याला मुभा नाही आणि त्यामुळे, हुकूमनामा निर्भावता आहे. अशा परिस्थितीत, आक्षेप विचारात घ्यावे असे अंमलबजावणी न्यायालयास निर्देश देण्यामध्ये उच्च न्यायालय योग्य होते असे म्हणता येणार नाही.

तदनुसार अपील अनुमत करण्यात येते. वाद खर्चाबाबत कोणताही आदेश नाही.

अपील अनुमत.

**अस्वीकरण**

या न्यायनिर्णयाच्या मराठी भाषेतील या अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याच्या/ तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याही कारणाकरीता वापर करता येणार नाही तसेच इंग्रजी भाषेतील न्यायनिर्णय हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरिता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबजावणी करता वैध मानला जाईल.